**सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना “निवृत्तीवेतन योजना” लागू करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: इबांका-०५२६/प्र.क्र.७१(II)/काम-७**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ जुलै, २०२६

**वाचा-**

१. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्थी) अधिनियम, १९९६
२. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७
४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, अधिसूचना क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७६/कामगार-७, दिनांक ३०.११.२०२३
५. केंद्र शासनामार्फत निर्गमित सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० दिनांक २१.११.२०२५
६. सामाजिक सुरक्षा संहिता (केंद्रीय) नियम, २०२५ दिनांक ३०.१२.२०२५
७. महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ (मसूदा) दिनांक ०५.०५.२०२६
८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बैठकीतील ठराव क्र.६५ (१-११)/२०२६, दिनांक १२.०५.२०२६
९. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.१२३४/२०२६/कायदा-२०२६/प्र.क्र.१३/मंडळ-०१, दिनांक १९.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचे व सेवाशर्तींचे नियमन करण्यासाठी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य आणि त्यांच्याकरीता कल्याणकारी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला होता. त्यास अनुसरुन इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ तयार करण्यात आले. सदर अधिनियमाच्या कलम १८ अन्वये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने दिनांक २६.०६.१९९६ च्या अधिसूचनेद्वारे एकुण प्रकल्प खर्चाच्या १% (जमिनीचे मूल्य वगळता) इतका उपकर निश्चित केला आहे. त्यानुसार राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची



Scanned with OKEN Scanner

मंडळामार्फत नोंदणी व नुतनीकरण करण्यात येऊन मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराच्या निधीमधून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध कल्याणकरी योजना राबविल्या जात आहेत.

केंद्र शासनाने २९ कामगार कायदे निरसित करुन चार नवीन कामगार संहितांची (Labour Codes) अंमलबजावणी दिनांक २१.११.२०२५ पासून संपूर्ण देशात सुरु केली आहे. त्याअंतर्गत संदर्भिय क्र.१ व २ येथील अधिनियम निरसित करण्यात आले असून आता इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाशी संबंधित बाबींचा समावेश "सामाजिक सुरक्षा संहिता-२०२०" मध्ये करण्यात आला आहे.

सदर संहितेच्या कलम (७) (६) मध्ये बांधकाम कामगारांना कोणत्या बाबीकरीता विविध कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे, याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. यानुसार कलम (७) (६) (b) मध्ये *"make payment of pension to the beneficiaries who have completed the age of sixty years."* अशी तरतूद नमूद केली आहे.

या तरतुदीस अनुसरुन मंडळाने दिनांक १२.०५.२०२६ रोजीच्या बैठकीत ठराव पारीत करुन संदर्भिय क्र.९ अन्वये मंडळांतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. वयाची ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतर बांधकाम कामगाराची मंडळाकडे नोंदणी होत नाही व त्याच्या पुर्वीच्या नोंदणीचे नुतनीकरणही होत नाही. त्यामुळे मंडळाकडून मिळणाऱ्या विविध योजनांपासून कामगार वंचित राहतो. अशावेळी त्यांच्या वृद्धापकाळात त्यांचे जीवन सुकर होण्याकरीता हातभार लावण्याच्या दृष्टीने त्यांना सहाय्य करण्याकरीता यापूर्वी मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी सुरु असलेली निवृत्तीवेतनाबाबतची योजना बंद करुन सामाजिक सुरक्षा संहितेमधील उक्त नमूद तरतुदीनुसार सुधारित **"निवृत्तीवेतन योजना"** लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांकरीता त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर, यापूर्वी राबविण्यात येणारी निवृत्तीवेतन योजना रद्द करुन सामाजिक सुरक्षा संहितेमधील उक्त नमूद तरतुदीनुसार दरवर्षी रक्कम रू.१२,०००/- इतके निवृत्तीवेतन अदा करण्याबाबतची सुधारित **"निवृत्तीवेतन योजना"** लागू या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**(१) निवृत्तीवेतन योजनेचे पात्रता निकष:-**

(अ) वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व मंडळाकडे सलग किमान १० वर्ष नोंदित असलेले सर्व बांधकाम कामगार सदर योजनेअंतर्गत पात्र राहतील. तसेच त्याच्या कुटुंबातील पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार असतील तर ते स्वतंत्रपणे पात्र राहतील.

(ब) पती/पत्नी च्या मृत्यूनंतर संबधित बांधकाम कामगाराचे पती/पत्नी निवृत्तीवेतनाकरिता पात्र राहतील. तथापि, पती/पत्नी सदर योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत असेल तर संबधितास दुबार निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नाही.

(क) केंद्र शासनाच्या आदर्श कल्याणकारी योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचाऱ्यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त करणारे बांधकाम कामगार निवृत्तीवेतनास पात्र राहणार नाहीत.



Scanned with OKEN Scanner

**(२) निवृत्तीवेतनाचे निकष आणि प्रमाण/दर :-**

(अ) मंडळाकडे नोंदित पात्र बांधकाम कामगारांना त्यांच्या मंडळाकडील नोंदणीच्या कालावधीनुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.

(ब) मंडळाकडे नोंदणी असलेल्या वर्षानुसार निवृत्तीवेतनाचे प्रमाण/दर खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | मंडळाकडे नोंदणीची एकूण वर्षे | दरवर्षी मिळणारे निवृत्तीवेतन (रू.) |
|---|---|---|
| १ | १० वर्षे | ५०% (रू.६,०००/-) |
| २ | १५ वर्षे | ७५%(रू.९,०००/-) |
| ३ | २० वर्षे | १००% (रू.१२,०००/-) |

(क) मंडळाकडे जमा होणाऱ्या कामगार उपकराचा वेळोवेळी आढावा घेवून, सदर योजनेअंतर्गत देय निवृत्तीवेतनामध्ये कमी अथवा वाढ करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे याबाबत निर्णय मंडळ मान्यतेअंती शासन स्तरावर घेतला जाईल.

**(३) निवृत्तीवेतन लाभ मंजूर करण्याची कार्यपद्धती :-**

(अ) सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगाराने https://mahabocw.in/ या मंडळ अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुना अर्ज विनामूल्य प्राप्त (Download) करून घ्यावा. (अर्जाचा नमूना **"प्रपत्र-अ"** प्रमाणे)

(आ) सदरचा अर्ज पूर्णपणे भरून पात्र नोंदीत बांधकाम कामगाराने त्याचे आधार कार्ड ज्या जिल्ह्यामधील आहे त्या जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्राचे (WFC) प्रभारी (कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांच्याकडे जमा करावा.

(इ) निवृत्तीवेतन अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :-

१. पत्त्याचा पुरावा-आधार कार्ड साक्षांकित छायाप्रत

२. जन्मतारखेचा पुरावा-जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित छायाप्रत

३. बँक खाते पासबुक साक्षांकित छायाप्रत

(ई) संबधित प्रभारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी सदर अर्जाची छानणी करून "निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र" (**प्रपत्र-ब**) सह प्रस्ताव मंडळ मुख्यालयास मान्यतेस सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्ह्यामध्ये नोंदणी/नुतनीकरणाचा कालावधी असल्यास संबधित जिह्यामधून "वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र" (**प्रपत्र-क**) संबधित प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांनी प्राप्त करून घ्यावे.

(उ) मंडळ स्तरावर सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेअंती संबधित बांधकाम कामगारास "निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र" देण्यात येईल. (**प्रपत्र-ड**)

(ऊ) निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक हा संबधित बांधकाम कामगाराचा निवृत्तीवेतन दिनांक समजण्यात येईल व त्यानुसार वर्ष गणना करण्यात येईल.

(ए) दरवर्षी माहे नोव्हेंबर मध्ये मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याच्या हयातीचा दाखला(प्रपत्र-इ) पुरावा स्वरूपात मंडळाकडे सादर करावा लागेल त्यासाठी त्याने आधारकार्ड/मंडळाचे नोंदणी कार्ड व निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा कामगार



Scanned with OKEN Scanner

सुविधा केंद्रामध्ये समक्ष उपस्थित राहून जिल्ह्याचे प्रभारी अधिकाऱ्यांकडून हयातीचा दाखला प्राप्त करून द्यावा.जेणेकरून, त्या वर्षीचे निवृत्तीवेतन त्याच्या खात्यात जमा करता येईल.

(ऐ) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगारास त्याचे बँक खाते बदलावयाचे असल्यास तसा अर्ज त्यास प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ओ) मंडळाच्या निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्याचा/तीचा वारसदार पती/पत्नीने वारस नोंदीचा अर्ज प्रभारी, जिल्हा बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(औ) सदर निवृत्तीवेतन क्रमांकाची नोंद एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) या प्रणालीवर घेण्यात येईल व दरमहा संबधित निवृत्तीवेतनधारक बांधकाम कामगाराच्या खात्यावर निवृत्तीवेतन जमा करण्यात येईल.

**(४) मासिक निवृत्ती वेतन प्रदानाची कार्यवाही :-**

मंडळ मुख्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या "निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्रांचे आधारे" प्रत्येक महीन्याच्या शेवटच्या आठवडयात त्यामहिन्याच्या १५ तारखेअखेर निर्गत निवृत्तीवेतन क्रमांक धारकांची मंडळ मुख्यालय स्तरावरील IWBMS प्रणालीचे व्यवस्थापक-मे.आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडून पुढील महिन्याच्या प्रदानार्थ निवृत्तीवेतन धारकांची प्रदान फाईल (Claim disbursement File) बँकेस आवश्यक नमून्यात तयार करण्यात येईल, सदर फाईल तयार करताना त्यामध्ये निवृत्ती वेतन धारकांचे बँक तपशील, व्दिरूक्ती इ.बाबींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येईल, सदर प्रदान फाईल मंडळाच्या लेखा शाखेस सादर होईल. लेखा शाखेच्या संबंधित कार्यासनाने सदर फाईलची आवश्यक तपासणी करून सदर प्रदान फाईल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतिम मान्यतेस्तव सादर करावी. सदर मान्यतेअंती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबधित पात्र निवृत्तीवेतन धारक बांधकाम कामगारांच्या बँक खात्यावर DBT in Cash प्रकाराने निवृत्ती वेतन जमा करण्यासाठी बँकेस पाठविण्यात यावी. लेखा शाखेने बँकेकडून वेळोवेळी यशस्वी /अयशस्वी प्रदानांचा ताळमेळ घ्यावा. अयशस्वी प्रदानाची स्वतंत्र प्रदान फाईल करण्यात यावी. व प्रत्येक महिन्याचा मासिक प्रगती अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावा.

**(५) मंडळ मुख्यालय स्तरावरील निवृत्तीवेतन समन्वय कक्ष :-**

उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरिता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हा कार्यकारी अधिकारी | कक्ष प्रमुख |
| २ | लेखाधिकारी | समन्वयक |
| ३ | संबंधित जिल्हयाचे जिल्हा कार्यालय प्रमुख | सदस्य |
| ४ | आयडब्ल्यूबीएमएस प्रणालीचे व्यवस्थापक संस्था मे.आरसीएस इन्फोटेक लिमिटेड यांचेकडील प्रकल्प संचालक | सदस्य |

६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणाऱ्या उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात यावा.

७. अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास त्यांना देय होणाऱ्या लाभाची वसूली करुन सदरहू कामगार फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरेल.



Scanned with OKEN Scanner

८.  सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार वरीलप्रमाणे मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित केलेल्या निवृत्तीवेतन योजनेबाबत मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये या शासन निर्णयातील तरतुदींनुसार आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात यावेत.

९.  सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्यात येईल. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

१०.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१३१२५७१४३८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.07.13 12:58:14 +05'30'

**(दिपक पोकळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्याक), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१२. सर्व मा. विधानसभा सदस्य
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
१४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई.
१६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई
१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१८. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराषट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१९. निवड नस्ती



Scanned with OKEN Scanner

# प्रपत्र-अ

## बांधकाम कामगार निवृत्तीवेतन अर्ज

१. बांधकाम कामगाराचे नाव :-

२. बांधकाम कामगाराचा नोंदणी क्रमांक:-

३. आधार क्रमांक:-

४. जन्मदिनांक:-

५. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक:-

६. प्रथम नोंदणी झाल्याचा दिनांक:-

७. प्रथम नोंदणी झालेल्या जिल्ह्याचे ठिकाण:-

८. नोंदणी कालावधीचा तपशिल:-

| अ.क्र. | नोंदणी / नुतनीकरणाचा दिनांक | नोंदणी / नुतनीकरणाचा कालावधी | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | दि.-------- | दि. ------ ते दि. --------- | |
| २ | दि.-------- | दि. ------ ते दि. --------- | |
| ३ | दि.-------- | दि. ------ ते दि. --------- | |
| ४ | दि.-------- | दि. ------ ते दि. --------- | |
| ५ | दि.-------- | दि. ------ ते दि. --------- | |

९. बँक खात्याचा तपशिल :-

(अ) बँकेचे नाव -

(ब) खाते क्रमांक -

(क) आय.एफ.एस.सी. क्रमांक –

१०. कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act,१९४८) अंतर्गत लाभ घेण्यात येतो का ? (होय/नाही) :-

११. कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ घेण्यात येतो का ? (होय/नाही) :-

उपरोक्त प्रमाणे सादर करण्यात आलेली माहीती सत्य असून, खोटी आढळून आल्यास नियमानुसार माझ्याविरूद्धच्या उचित कारवाईस पात्र असेन याची मला जाणीव आहे.

**(बांधकाम कामगाराचे नाव)**



Scanned with OKEN Scanner

# प्रपत्र-ब

## -: निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ---------------, नोंदणी क्रमांक ---------हे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत ------- वर्षे नोंदित होते. त्यांनी वयाची ६० वर्षे दिनांक ------ रोजी पूर्ण केली असून, त्यांना कर्मचारी राज्य विमा कायदा,१९४८ (Employees State Insurance Act,१९४८) व कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act,१९५२) अंतर्गत लाभ प्राप्त होत नाही. निकषानुसार ते दरवर्षी रक्कम रू. ------ (--%) निवृत्तीवेतनास पात्र आहेत.

प्रभारी अधिकारी :

पदनाम :

कार्यालयाचे नाव :

जिल्हा :

दिनांक :

ठिकाण :



Scanned with OKEN Scanner

# <u>प्रपत्र-क</u>

## <u>-: वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र :-</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ---------------, नोंदणी क्रमांक ---------हे जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र ------ अंतर्गत दिनांक ---- ते दिनांक --- अखेर नोंदित होते.

प्रभारी अधिकारी :

पदनाम :

कार्यालयाचे नाव :

जिल्हा :

दिनांक :

ठिकाण :



Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र-ड

## -: निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ---------------, नोंदणी क्रमांक ---------हे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत ------- वर्षे नोंदित होते. त्यांनी वयाची ६० वर्षे दिनांक ------ रोजी पूर्ण केली असून, त्यांना कर्मचारी राज्य विमा कायदा,१९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त होत नाही. निकषानुसार ते दरवर्षी रक्कम रू. ------ (--%) निवृत्तीवेतनास पात्र आहेत. त्यांना दिनांक ------- पासून निवृत्तीवेतनास पात्र ठरविण्यात येत असून, त्यांचा निवृत्तीवेतन क्रमांक------- हा राहील.

(लेखा अधिकारी)
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

दिनांक :

ठिकाण :



Scanned with OKEN Scanner